दिनांक ०५/०५/२०२०

# <u>प्रेस नोट</u>

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अस्थापनेवर कार्यरत असलेल्या खालील नमुद १ पोलीस अधिकारी व ८ पोलीस कर्मचारी यांना उत्कृष्ठ सेवेबद्दल मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुबई यांचे सन्मान चिन्ह / बोधचिन्ह जाहिर झाले बाबत**

आज दिनांक ०५/०५/२०२० रोजी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रागंणात १ पोलीस अधिकारी व ८ पोलीस कर्मचारी यांना उत्कृष्ठ सेवे बद्दल मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे **“पोलीस महासंचालक पदक”** मिळाल्याबद्दल मा.संदीप बिष्णोई पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांनी अभिनंदन केले व सर्व पदक विजेत्यांचे त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विजेत्यांमध्ये १.पोलीस निरीक्षक शैलेश सुधाकर गायकवाड (युनिट-२ गुन्हे शाखा), २. सपोफौ रविंद्र सोमा राठोड युनिट-१ गुन्हे शाखा, ३. पोहवा/९६ धर्मराज आवटे युनिट-४ गुन्हे शाखा, ४. पोहवा/८६ राजेंद्र शांताराम शेटे टी.ए.डब्ल्यु, गुन्हे शाखा ५.मपोहवा/२१७ प्रभावती दिलीप गायकवाड महिला सहा.कक्ष ६. पोहवा/३१९ अहमद हसन शेख चिंचवड पोलीस स्टेशन ७. पोना/६९९ संदिप मारुती होळकर हिंजवडी पोलीस स्टेशन ८. पोना/७१८ दत्तात्रय मारुती बनसुडे युनिट ५ गुन्हे शाखा, ९. मपोना/७५० दिपमाला नंदकुमार लोहकरे एमआयडीसी भोसरी पो.स्टे. या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रसंगी मा. संदीप बिष्णोई पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी यापुढेही आपण सर्व जणं अशीच उत्तम कामगीरी करुन पोलीस दलाचे नाव उंचवावे तसेच तुमचे सर्व मित्र परिवार,सहकारी व नातेवाईक यांना सुध्दा तुम्ही प्रेरीत करा व असेच पोलीस दलात उत्कृष्ठ कार्यकरुन पुढे जावुन राष्ट्रपती पदक मिळवण्याचा प्रयत्न करावा असे गौरवोद्‌गार काढुन त्यांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री. संदीप बिष्णोई यांचेसह अप्पर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे व पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री. सुधीर हिरेमठ यांनी देखील पदक विजेत्यांचे कौतुक करुन मार्गदर्शन केले. सदर या छोटेखानी कार्यक्रम प्रसंगी सोशल डिस्टन्सींगचे तंतोतंत पालन करण्यात आले होते.


Pimpri Chinchwad Police Commissionerate


Pimpri Chinchwad Police Commissionerate
Celebrates


Pimpri Chinchwad Police Commissionerate
Celebrates